<u>**हिंदु विवाह अर्ज क्र. १७/२०२२ मध्ये निशाणी क्र. १९ कडील अर्जावर आदेश.**</u>

१) मुळ अर्ज अर्जदार पतीने हिंदु विवाह अधिनियम कलम १३(१) मधील तरतुदीप्रमाणे विवाह विच्छेदीत होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणीच्या दरम्यानच्या काळात अंतरिम खावटी व प्रकरण चालविण्याचा खर्च मिळण्याबाबत गैरअर्जदार पत्नीने प्रस्तुतचा निशाणी क्र.१९ कडील अर्ज हिंदु विवाह अधिनियमाचे कलम २४ मधील तरतुदीनुसार दाखल केला आहे.

२) गैरअर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार अर्जदाराने गैरअर्जदारास दिलेल्या शारीरिक व मानसिक त्रासामुळे गैरअर्जदाराला तिच्या वडिलांच्या आश्रयाने नाईलाजाने मुलगी कु. केतकी हिला घेऊन मौजे दारव्हा येथे राहावे लागत आहे. गैरअर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदारास भरणपोषण, कपडेलत्ते, औषधपाणी व मुलीच्या शिक्षणासाठी दरमहा ३० ते ३५ हजार रुपये खर्च येतो. तसेच गैरअर्जदार हिस न्यायालयात कोर्ट केसेसचा खर्च करावा लागतो. गैरअर्जदारा च्या कथनानुसार अर्जदार हा दर्यापुर येथील ग्रामीण रुग्णालयात लॅब असीस्टंट म्हणून शासकीय नोकरीवर असून त्याला दरमहा ७०,०००/- रुपये पर्यंत पगार आहे. तसेच अर्जदाराचे मौजे अंजनगांव सुर्जी येथे मोठे घर असून त्यामध्ये भाडेकरु ठेवले आहेत व त्या भाडेकरुकडून दरमहा रुपये ३०,०००/- इतकी भाड्याची रक्कम मिळते.

३) गैरअर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार गैरअर्जदाराने या प्रकरणातील अर्जदाराविरुद्ध न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा यांच्या न्यायालयात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमातील

तरतुदीप्रमाणे प्रकरण दाखल केले असून त्याचा क्रमांक पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. क्र. ४१/२०१६ असा आहे व त्या प्रकरणामध्ये न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा या न्यायालयाने त्या प्रकरणातील अर्जदारास म्हणजेच या प्रकरणातील गैरअर्जदारास दरमहा रुपये ५,०००/- व मुलीकरीता दरमहा रुपये २,०००/- इतकी पोटगी देण्याचा आदेश दिनांक १२/०९/२०१७ रोजी पारीत केला आहे. परंतु अर्जदार हा सदरची पोटगीची रक्कम नियमितपणे भरत नसून त्याच्याजवळ जवळपास रुपये २,५०,०००/- थकीत आहे. गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा यांनी दिलेल्या दरमहा रुपये ७,०००/- च्या खावटीच्या आदेशाला ६ वर्ष पुर्ण झाले असून ६ वर्षात महागाई वाढली आहे व त्यामुळे त्या रकमेतून मुलीचा शैक्षणिक खर्च, औषधपाणी व कपडालत्ता हा खर्च करणे शक्य होत नाही. गैरअर्जदाराने शेवटी अशी विनंती केली आहे की, गैरअर्जदाराला अर्जदाराने दरमहा रुपये ३०,०००/- इतकी अंतरिम पोटगी देण्याचा आदेश व्हावा व तसेच ही केस चालविण्याकरीता रुपये २५,०००/- इतका खर्च देण्याचा आदेश व्हावा.

४) अर्जदार पतीने गैरअर्जदार पत्नीच्या प्रस्तुतच्या निशाणी क्र. १९ कडील अर्जास निशाणी क्र. २४ कडे जबाब दाखल केला आहे. अर्जदार पतीने निशाणी क्र. २४ कडील लेखी जबाबामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक २४/०६/२०१२ रोजी झाल्याचे व अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांच्या विवाह संबंधातून एक मुलगी झाल्याचे मान्य केले आहे. तसेच अर्जदाराने निशाणी क्र. २४ कडील लेखी जबाबामध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराविरुद्ध दाखल केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणामध्ये म्हणजेच पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. नं.४१/२०१६ या प्रकरणामध्ये गैरअर्जदार व तिच्या मुलीकरीता दरमहा रुपये ७,०००/- इतकी अंतरिम

खावटी मंजूर झाल्याचे मान्य केले आहे. अर्जदाराच्या निशाणी क्र. २४ कडील लेखी जबाबातील कथनानुसार गैरअर्जदार ही स्वेच्छेने तिच्या माहेरी राहत आहे. तसेच गैरअर्जदार ही अर्जदाराला हेतुपुरस्पर संसार सुखापासून व मुलीच्या प्रेमापासून वंचित ठेवत आहे. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला अत्यंत क्रुरपणाची वागणुक दिली आहे. अर्जदाराने त्याला दरमहा रुपये ७०,०००/- पर्यंत पगार असल्याचे व दरमहा रुपये ३०,०००/- इतके घरभाडे मिळत असल्याचे नाकारले आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराचा अंतरिम पोटगी मिळण्याचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६) गैरअर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार गैरअर्जदाराने या प्रकरणातील अर्जदाराविरुद्ध न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा यांच्या न्यायालयात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. क्र. ४१/२०१६ हे प्रकरण दाखल केले आहे व त्या प्रकरणामध्ये न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा या न्यायालयाने त्या प्रकरणातील अर्जदारास म्हणजेच या प्रकरणातील गैरअर्जदारास दरमहा रुपये ५,०००/- व मुलीकरीता दरमहा रुपये २,०००/- इतकी पोटगी देण्याचा आदेश दिनांक १२/०९/२०१७ रोजी पारीत केला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराने निशाणी क्र. २४ कडील लेखी जबाबामध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराविरुद्ध दाखल केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणामध्ये म्हणजेच पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. नं.४१/२०१६ या प्रकरणामध्ये गैरअर्जदार व तिच्या मुलीकरीता दरमहा

रुपये ७,०००/- इतकी अंतरिम खावटी मंजूर झाल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार अर्जदार हा सदरची पोटगीची रक्कम नियमितपणे भरत नाही. परंतु पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए.नं.४१/२०१६ या प्रकरणामध्ये अर्जदाराने न्यायालयाच्या आदेशानुसार अंतरिम पोटगीची रक्कम जमा केली असल्याबाबतच्या अर्जाच्या सत्यप्रती अर्जदाराने निशाणी क्र. २६ कडील यादीसोबत अनुक्रमांक ३ ते ४१ कडे दाखल केल्या आहेत. पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए.नं.४१/२०१६ या प्रकरणामध्ये न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दारव्हा यांनी या प्रकरणातील गैरअर्जदारास पुरेशी अंतरिम पोटगी मंजूर केलेली आहे व त्यामुळे माझ्या मते गैरअर्जदार पत्नीने प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार पतीकडून हिंदु विवाह कायद्याचे कलम २४ प्रमाणे अंतरिम निर्वाह भत्ता मिळण्याची केलेली विनंती समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते गैरअर्जदार पत्नी ही या प्रकरणात अर्जदार पतीकडून अंतरिम निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र नाही. परंतु अर्जदार पतीने गैरअर्जदार पत्नीविरुद्ध विवाह विच्छेदीत होवून मिळण्याकरीता प्रस्तुत प्रकरण दाखल केल्यामुळे गैरअर्जदार पत्नीला या प्रकरणात हजर व्हावे लागले आहे. गैरअर्जदार पत्नीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार गैरअर्जदाराला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिला हे प्रकरण चालविण्यास व तारखेला जाण्यायेण्याकरीता खर्च येत आहे. अर्जदार पतीने प्रस्तुत अर्जास दिलेल्या जबाबामध्ये गैरअर्जदार पत्नीस कोणते उत्पन्नाचे साधन असल्याबाबत कथन केले नाही व तसेच गैरअर्जदार पत्नीच्या उत्पन्नाच्या स्त्रोताबाबतचा कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आणला नाही. अशा परिस्थीतीत माझ्या मते गैरअर्जदार पत्नी ही अर्जदार पतीकडुन हिंदु विवाह अधिनियमाचे कलम २४ मधील तरतुदीनुसार प्रकरण चालविण्यासाठी खर्चाची रक्कम मिळण्यास पात्र आहे. अर्जदार पतीने मुळ

अर्जाच्या टायटल क्लॉजमध्ये त्याचा धंदा नोकरी असा नमूद केला आहे. प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता व अर्जदार पतीचे उत्पन्नाचे साधन विचारात घेता माझ्या मते गैरअर्जदार पत्नी ही तिच्या पतीकडून या प्रकरणाच्या खर्चापोटी एकमुस्त रक्कम रुपये २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. पती गजानन रामकृष्ण पोहोकर याने पत्नी सौ. मोहिनी गजाननराव पोहोकर हिला सदर प्रकरणाच्या खर्चापोटी एकमुस्त रक्कम रुपये २०,०००/-(रुपये वीस हजार फक्त) द्यावी.

३. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

स्वा/-

दिनांकः- २०/०२/२०२४　　(पां. लिं. घुले)

ठिकाणः- दारव्हा　　दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,

दारव्हा.